साक्षीदार क्र ०२ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रकाश रामाजी भुरे
वय ४९ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात आला. मी घटनास्थळावर गेलो नव्हतो. घटनास्थळ पंचनामा झाल्यानंतर मी घटनास्थळावर गेलो व पंचनाम्यावर सही केली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१५** देण्यात आले. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/१२/२०२२ रोजी खातखेडा शिवार येथे पोलिसांनी समन्स दिल्यानंतर मी तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे हजर असतांना पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला त्यातील मजकूर मला वाचुन व समजुन सांगितला त्यानंतर मी त्यावर सही केली. सदर घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र.१६ देण्यात आला.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.श्री.पी.एच.रघुते यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

३. खातखेडा शिवारामध्ये माझी शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, उमरेड ते सिर्सी हा रस्ता वर्दळीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी अपघात झाला होता त्या ठिकाणी पोलिस आधीच अपघातस्थळावर आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी जी लिखापढाई केली होती ती मी जाण्यापुर्वीच केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कागदावर मी सह्या केल्या ते कागद पोलिसांनी आधीच लिहून तयार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर कागदावर काय लिहीले आहे याबाबत मला काही माहित नाही. हे

म्हणणे खरे आहे की, पोलिसांच्या सांगण्यावरून मी त्यावर सही केली. सिर्सी ते उमरेड रस्त्यावर अधामधात अपघात होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या कागदावर सह्या घेतल्या हे मी आजरोजी सांगू शकत नाही. पोलिसांनी आर्टीकल अ फोटो काढला हे मला आठवत नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१८/०८/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड